P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक - २१/०४/२०२४**

# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील दहशत माजविणारे व हातभट्टी दारु तयार करुन विकणा-या कुप्रसिध्द गुन्हेगारांना मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी "एम.पी.डी.ए. कायद्यान्वये केले स्थानबद्ध.

आगामी लोकसभा २०२४ निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर मा.पोलीस आयुक्त, श्री.विनय कुमार चौबे, यांनी आगामी लोकसभा निवडणुक हया भयमुक्त व पारदर्शक व नि:पक्षपातीपणे पार पाडता याव्यात यासाठी व्यापक प्रतिबंध कारवाईचा आराखडा तयार केला असुन त्या अंतर्गत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील दहशत माजवून गुन्हे करणारे गुन्हेगार यांचा अभिलेख तपासुन त्यांचेवर परिणामक व कठोर कारवाई करण्याचे आदेश दिलेले असुन त्याप्रमाणे पोलीस स्टेशन स्थरावर कारवाई सुरु करण्यात आलेली आहे.

१) पिंपरी पोलीस स्टेशन यांनी अभिलेख तपासून पहाता पिंपरी,हिंजवडी,वाकड पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **सलमान रमजान शेख वय २८ वर्षे रा.साई श्रध्दा कॉलनी, नढेनगर, काळेवाडी पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे.त्याने त्याच्या साथीदारांसह **कोयता सारखी जीवघेणी हत्यारांसह खुनाचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत, चोरी व बेकायदेशिररित्या विनापरवाना घातक शस्त्रे जवळ बाळगणे** यासारखे **०९ गंभीर** गुन्हे केलेले आहेत.त्यांचा **स्थानबध्दतेबाबतचा प्रस्ताव पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे** पिंपरी पोलीस स्टेशन येथून **प्राप्त झाला.**

२) चाकण पोलीस स्टेशन यांनी अभिलेख तपासून पहाता चाकण पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **सतिश ऊर्फ प्रशांत बाबुराव दातार, वय २१ वर्षे, रा. खंडोबामाळ, आंबेडकरनगर, चाकण ता. खेड जि पुणे,** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे.त्याने त्याच्या साथीदारांसह **गंभीर दुखापत, खंडणी गोळा करणे,** यासारखे **०३ गंभीर** गुन्हे केलेले आहेत. त्यांचा **स्थानबध्दतेबाबतचा प्रस्ताव पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे** चाकण पोलीस स्टेशन येथून **प्राप्त झाला.**

. ३) हिंजवडी पोलीस स्टेशन यांनी अभिलेख तपासून पहाता हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **शुभम रुपसिंग भाट, वय-२६ वर्षे, रा. संत ज्ञानेश्वर कॉलनी, थेरगांव, पुणे,** याने **गावठी हातभट्टी तयार करणे, विक्री करणे करीता जवळ बाळगणे** अशा प्रकारचे **०६ गुन्हे** केलेले आहेत. त्यांचा **स्थानबध्दतेबाबतचा प्रस्ताव पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे** हिंजवडी पोलीस स्टेशन येथून **प्राप्त झाला.**

वरील तीनही प्राप्त प्रस्ताव व कागदपत्रांची पडताळणी करुन **मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे, पिंपरी चिंचवड** यांनी वर नमुद इसमांचे विरुध्द **एम.पी.डी.ए. कायद्यान्वये येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा पूणे येथे स्थानबध्दतेचे आदेश** पारीत केलेले आहेत.

मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी वरील प्रमाणे गुन्हे करणा-या गुन्हेगारांवर कडक प्रतिंबधक कारवाई करण्याचे अवलंबिले आहे. एम.पी.डी.ए.कायदयान्वये स्थानबद्धतेची **२०२४ मध्ये एकूण ७** कारवाई करण्यात आलेल्या असून यापुढे ही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

सदरची कामगीरीही पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मा.श्री. विनय कुमार चौबे (पोलीस आयुक्त), मा.श्री. वसंत परदेशी (अपर पोलीस आयुक्त), मा.श्री. संदिप डोईफोडे (पोलीस उप-आयुक्त गुन्हे), मा.श्री. बापु बांगर (पोलीस उप-आयुक्त परि-०२), मा.श्रीमती स्वप्ना गोरे मॅडम (पोलीस उप-आयुक्त परि-०१), मा.श्री.डॉ. शिवाजी पवार (पोलीस उप-आयुक्त परि-०३), मा.श्री. राजेंद्रसिह गौर (सहा.पोलीस आयुक्त चाकण विभाग), मा.श्री. सचिन हिरे (सहा.पोलीस आयुक्त पिंपरी विभाग), मा. विशाल हिरे (सहा.पोलीस आयुक्त, वाकड विभाग), मा.श्री. बाळासाहेब कोपनर (सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-०१) यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि श्री. अशोक कडलग (पिंपरी पो.स्टे), वपोनि श्री. कन्हेया थोरात (हिंजवडी पो.स्टे) वपोनि श्री. प्रमोद वाघ (चाकण पो.स्टे) पोनि श्री. अनिल देवडे (पी.सी.बी गुन्हे शाखा), सहा.पोलीस निरीक्षक श्री. संभाजी जाधव (पो.आ. वाचक), पोलीस अंमलदार सचिन चव्हाण, व्यंकप्पा कारभारी (पी.सी.बी गुन्हे शाखा), ओंकार बंड (पिंपरी पो.स्टे), ऋषीकेश झनकर, शरद उभे (हिंजवडी पो.स्टे), पारवे चाकण पो.स्टे. यांनी केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड आयुक्तालय